महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष.
११/१०३९ साकेत पब्लीक शाळेच्या समोर गणेश नगर, गोंदिया
E mail Id- dmmugondia@gmail.com
फोन नं. ०७१८२-२३६६२०

जाक्रं.एमएसआरएलएम /गों./संपा/५५८/२०१७
दिंनाक :- १२/१०/२०१७

**संदर्भ - एमएसआरएलएम/गो/संपा/३४१/२०१७ दि. ०७/०७/२०१७**

## प्रशिक्षण केंद्र निवडीबाबत जाहिरात क्र. २

राज्यात दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान ची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यात उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे. या अभियानाची अंमलबजावणी जिल्हा स्तरावर जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात येत आहे. जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, गोंदिया अंतर्गत गोरेगांव, आमगांव, सडक अर्जुनी व देवरी येथे स्वयं सहाय्यता गटासाठी व ग्रामसंघासाठी विविध निवासी व अनिवासी प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते. या करिता त्यांची निवास व्यवस्था, सुसज्ज प्रशिक्षण कक्ष असलेल्या प्रशिक्षण केद्राचे दर निश्चित करुन १ वर्षाकरिता करार करणे आहे. त्याकरिता संदर्भिय जाहिरात प्रकाशित करुन इच्छुक संस्थांनी/ सेवापुरवठादारांकडुन अर्ज आमंत्रित करण्यात आले होते. तथापी पुरेशा संख्येत अर्ज प्राप्त झाले नसल्याने खालील प्रमाणे पुन:अर्ज आमंत्रित करण्यात येत आहे.

इच्छुक संस्थांनी/ सेवापुरवठादार यांनी वर नमुद केलेल्या पत्त्यावरुन किंवा www.zpgondia.gov.in या संकेत स्थळावरुन किंवा www.umed.in या संकेत स्थळावरुन अर्जाचा नमुना प्राप्त करावा. लेखी अर्ज सादर करण्याची अंतीम मुदत दि. २६/१०/ २०१७ दुपारी ३.०० वाजे पर्यंत आहे. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. संदर्भिय जाहिरातीच्या अनुषंगाने ज्यांनी अर्ज सादर केलेला आहे त्यांना पुन: अर्ज सादर करणे आवश्यक नाही. अर्जाच्या छानणी नंतर प्रत्येक जागेची पाहणी करुन महिलाच्या प्रशिक्षणासाठी योग्य असणाऱ्या व अभियानाच्या इतर अटी व शर्ती नुसार असलेल्या प्रशिक्षण केंद्र/ मंगल कार्यालय/ हॉटेल/इतर सेवापुरवठादार यांची यादी निश्चित करुन त्यांच्याकडुन निविदा मागविण्यात येतील.

सेवा पुरवठादारांची यादी निश्चित करण्याचे अधिकार उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाने राखुन ठेवलेले आहेत. अर्ज सादर करण्याच्या मुदतीस बदल झाल्यास त्याबाबतची सुचना जिल्हा परिषद, गोंदिया व जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, गोंदिया च्या सुचना फलकावर आणि www.zpgondia.gov.in व www.umed.in संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी सेवा पुरवठादार यांच्याकडुन कोणतीही निविदा शुल्क व EMD रक्कम घेण्यात येणार नाही.

Dnahare
१२।१०।१७

जिल्हा अभियान संचालक (उमेद) तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जि.प.गोंदिया

# अर्जाचा नमुना

प्रति,

मा. जिल्हा अभियान संचालक
उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.गोंदिया

विषय:- प्रशिक्षण केंद्र निवडीबाबतची माहिती सादर करण्याबाबत.
संदर्भ- आपली दिनांक रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेली जाहिरात.

महोदय,

वरील विषयास अनुसरुन मी प्रशिक्षण केंद्र निवडीबाबतच्या निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याबाबत लागणारी माहिती खालील प्रमाणे सादर करीत आहे.

| अ.क्र. | विवरण | माहिती |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव/सेवा पुरवठादाराचे नाव व पत्ता | |
| २ | प्रकार(वैयक्तीक, भागीदारी, अशासकीय संस्था इ.) | |
| ३ | प्रशिक्षण केंद्र/मंगल कार्यालय/हॉटेल व्यवसाय इत्यादी यांचे ठिकाण | |
| ४ | आपणाकडे DSC आहे काय? (Digital Singnature Certificate) | |
| ५ | आपली संस्था mahatenders.gov.in या संकेत स्थळावर नोंदणीकृत आहे का? असल्यास Registerd Login ID नमुद करावा. | |
| ६ | Shop & Establishment Act अंतर्गत नोंदणीकृत आहे काय? नसल्यास व्यवसायासाठी लागणारा इतर कोणता परवाना आहे काय ? | |
| ७ | Pan Card आहे का? | |
| ८ | लागू असलेल्या कराअंतर्गत नोंदणी आहे का? | |
| ९ | प्रशिक्षणासाठी किती हॉल आहेत? चौ. फुटा मध्ये आकारमान नमुद करावे. | |
| १० | प्रशिक्षणासाठी एका वेळी किती व्यक्ती बसू शकतील? | |
| ११ | प्रशिक्षण हॉल मध्ये पंखे, टेबल, खुर्च्या, कुलर, जनरेटर ई. आवश्यक सुविधा पैकी कोणती बाबी आहेत? | |
| १२ | राहण्याची सोय आहे काय? असल्यास एका वेळी किती व्यक्ती राहू शकतात? | |
| १३ | एकुण किती शौचालय व स्नानगृह आहेत? | |
| १४ | सुरक्षेच्या दृष्टीने काय व्यवस्था आहे? | |

वर नमुद केलेली माहिती ही बरोबर असून प्रत्यक्ष भेटी दरम्यान ती उपलब्ध असेल याची मी खात्री देतो.

संस्थेचे नाव व शिक्का

संपर्क क्र.